Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# प्राचीन महाराष्ट्रातील जलव्यवस्थापनाचे विविध स्त्रोत - एक अभ्यास

**राम फुन्ने**

प्राचार्य , स्व.निती-न महाविद्यालय, पाथरी , जि. परभ⃞ी.

***सारांश*** :

'जलव्यवस्थापन' हे प्राचीन मानवाच्या जीवनाचे अतिशय वैशिष्ट्येपूर्ण असे अंग होते. प्राचीन काळापासून भारतातील सर्वच नगरे नद्यांच्या तिरावर किंवा एखाद्या तलावाजवळ वसेलेली होती. कायम किंवा निश्चित पाणीपुरवठा सहज उपलब्ध होईल अशा ठिकाणाचा शोध घेऊन मग त्याच ठिकाणी गाव वसविले जायचे व नंतर त्या गावात गावातील लोकसंख्येवरुन गावामध्ये आड, विहीर, बारव, पोखरणी अशा जलाशयाची निर्मिती होत असे.

***प्रस्तावना :***

यादवांच्या काळात हेमाडपंथी मंदिरांची निर्मिती खूप मोठ्या प्रमाणावर झाली आणि याच काळात बारव स्थापत्याचीही निर्मिती फार मोठ्या प्रमाणात झाली. अगदी सुरुवातीच्या काळात 'पाणीयपोढी' किंवा 'पाणपोढी' म्हणजे पिण्याचे पाणी साठवण्याची टाकी आणि 'न्हानकोठी' म्हणजे स्नानासाठी लागणाऱ्या पाण्याचा साठा.

विविध राजकीय राजांच्या राजवटीत तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जलशयाच्या निर्मिती केली. उदा.त्र्यंबकेश्वर, (जि.नाशिक) येथे कुशावर्त १८ व्या शतकात बांधलेले तीर्थस्थान. तसेच परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, माहोर, तुळजापूर, कोल्हापूर या ठिकाणी जलस्त्रोत म्हणून कुंड, कल्लोळ यांची निर्मिती झाली या ठिकाणी यात्रेच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात लोक जमत असत म्हणून त्या ठिकाणी पाण्याचे व्यवस्थापन केले जात असे.

विहीर, कल्लोळ, कुंड, पोखरणी व बारव निर्मितीचे तंत्रे व त्यांचे आकार-प्रकार याची माहिती विविध प्राचीन ग्रंथातून आढळते. नगराच्या बाहेर व आत निरनिराळ्या प्रकारचे जलाशय असत. विहीर वापी हे कृपाचे प्रकार आहेत. तर कुंड म्हणजे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्नानासाठी बांधलेले मोठ्या आकाराचे पण उथळ हौद होय. कृपाचे दहा, वापीचे चार, कुंडाचे चार व तगडाचे सहा प्रकार आहेत. असे श्री भुवनदेव यांनी आपल्या 'अपरिचिततृच्छा' या ग्रंथात लिहिलेले आहे. 'नंदा' म्हणजे एकमुख व तीन कुट असलेली वापी. मुख म्हणजे विहीरीत पाण्यापर्यंत जाण्याचा मार्ग तर कुट म्हणजे चौरस खोली, मंडप किंवा माड होय. तो आकाराने चौरस किंवा आयाताकृती असतात.

प्रत्येक ठिकाणच्या 'जलव्यवस्थापनाचा' अभ्यास केल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, बारव, विहीर, कुंड, यांच्या मध्ये किंवा जवळ देवदेवतांच्या मुर्ती ठेवण्यासाठी काही जागा शिल्लक ठेवत असत. इडोळी, पिंगळी, चारठाणा, जागजी ज्या ठिकाणी मुर्तीची स्थाप-ना झाली त्या जागेच व पाण्याच पावित्र्य राखल जाव असाही उद्देश त्यामागे असू शकतो.

महाराष्ट्रातील जलव्यवस्थापन विविध प्रकारे झालेले होते म्हणजे जलव्यवस्थापनाचे विविध स्त्रोत होते त्याची वर्गवारी आपण पुढील प्रमाणे करु शकतो. पाण्यावर लोकांच जीवन अवलंबून असल्याने ८ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत विहीरी, बारव, कुंड, कल्लोळ, आड, तडाग आशा प्रकारे जलव्यवस्थापनाला त्या काळात विविध माध्यमाद्वारे साठविने किंवा त्या काळात पाणी साठविण्याचे विविध स्त्रोत निर्माण केले होते. त्या काळात लोकांना स्वच्छ पाणी मिळाव यासाठी आड विहीरी बांधणे हे पुण्याच काम समजल जात असे.

मंदिराच्या विकासाबरोबर महाराष्ट्रात बारव स्थापत्याचीही निर्मिती फार मोठ्या प्रमाणात झाली. बारवातील पाण्याची विटंबना होऊ नये. पाण्याला दुषीत करु नयेत म्हणून त्या काळी पाण्याच्या जवळच मंदिराची निर्मिती केली गेली किंवा बारवातच मुर्तीची स्थापना केल्या गेली म्हणून मंदिराबरोबर बारवाचेही पावित्र्य राखले गेले.

**जलव्यवस्थापनाचे विविध स्त्रोत :**

पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाद्वारे आपली पाण्याची गरज मोठ्या प्रमाणात भागते. भारताचे स्थान मोसमी प्रदेशात येते. येथे पावसाळ्यात नद्यांना पूर येतो व उन्हाळ्यात नद्या कोरड्या पडतात. बारमाही पाण्याची गरज भागविण्यासाठी पाण्याचे योग्य व्यवस्थापन □र□ गरजेचे ठरते. म्हणून प्राचीन काळापासूनच मानवाने विहीर तलाव बारव कुंड कल्लोळ इत्यादींची निर्मिती करुन जलव्यवस्थापनाचे वैज्ञानिक पध्दतीने व्यवस्थापन केलेले दिसून येते.

**कुंड**

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्नानासाठी बांधलेला मोठ्या आकाराचा हौद म्हणजे कुंड. या कुंडाला आत जाण्यासाठी व भाविकांना सहज अंघोळ करण्यासाठी पायऱ्या असत. तेर येथील कुंड सर्वात प्राचीन आहे व तो विटानी बांधलेला आहे. अशा प्रकारचे कुंड मांढळ, मुखेड, त्र्यंबकेश्वर, पाली, माहूर, होट्टल या ठिकाणी आपल्याला आढळतात. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविक आल्यानंतर त्यांची अंघोळ, पाय धुणे यामुळे घान झालेले पाणी याचा मंदीर परिसरात असणारे झाडे याना त्या पाण्याचा उपयोग केला जात असे. एकंदरीत मंदिर परिसरात पिण्याचे पाणी सोडून इतर लागणारे पाणी याचे चांगले जलव्यवस्थापन करत असल्याचे आपल्याला दिसते.

**विहीर**

एकच प्रवेश असलेली वापी म्हणजे विहीर, वर्तुळाकार, चौरस, अष्टकोनी असे विविध विहीरीचे प्रकार असले तरीही गोलाकार विहीरी आपणास महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी पहायला मिळतात. अशा विहीरीचे बांधकाम करताना दगडी चिरा किंवा विटांनी बांधलेल्या असत. अनेक ठिकाणी आत जाण्यासाठी दगडी पायऱ्याही असल्याचे आढळून आले आहे. साधारणतः विहीरीतील पाण्याचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी व जास्तीत जास्त शेतीला पाणी देण्यासाठी त्याचा उपयोग करत असत. विहीरी जवळ 'आसरा' नावाच्या जलदेवतांच्या मुर्ती फार मोठ्या प्रमाणात आढळतात.

**आड**

पेय जलव्यवस्थापनात यांचा उपयोग फारमोठ्या प्रमाणात होत असे. ग्रामीण व शहरी भागात घरामध्ये अतिषय छोट्या आकाराचे आड असत साधारणतः हा आड एक मिटर पेक्षा कमी व्यासाचा अशतो. याला आत जाण्याचा कोणताही मार्ग नसतो. आड साधारणपणे चौरस अष्ठकोणी व गोलाकार आकारात आढळतात. साधारणतः एखाद्या कुटुंबाला घरातल्या घरात लागणारे पाणी या आडातूनच मिळत असे.

**□ल्लोळ**

कुंड या वास्तु प्रकाराचे थोडे विकसीत स्वरुप म्हणजे कल्लोळ. कल्लोळ आपणास मंदिर परिसरात फार मोठ्या प्रमाणात पहावयास आजही मिळतात. मंदिर परसरातील आलेल्या भाविकांना स्नान, संध्या, साठी याचा सहज उपयोग करता यावा म्हणून त्याला आत जाण्यासाठी प्रवेश मार्ग व टप्पे असतात. पण बारवाच्या तुलनेने ते लहान आकाराचे असतात. हातनूर जि.परभणी, आंबाजोगाई, गेवराई, परळी वैजनाथ, रामपूर, देवद्रोणी, देवगाव, नेवासा अशा धार्मिक स्थळाच्या ठिकाणी आजही आप□ास □ल्लोळ पहावयास मिळतात.

**बारव**

एकात एक लहान लहान होत जाणारे कुंड असे बारवाचे स्वरुप असते. कुंडाच्या वर विशिष्ट पायऱ्या ठेवून एक सोपान (टप्पा) ठेवतात त्यानंतर दुसरा-तिसरा टप्पा ठेवू-न झालेला विस्तार बारव स्थापत्यात पहावयास मिळतो. बारव जलव्यवस्थापनात आपणास चौकोन, आयात व अष्टकोनी आकारात आजही आपल्याला पहावयास मिळतात. अशा प्रकारचे बारव मुखेड व येरगी या ठिकाणी पहायला मिळतात. जलव्यवस्थापनेत अनन्यसाधारण असे महत्त्व बारवाला आहे. म्हणून प्राचीन काळात जलसंचयाचे एक महत्वाचे साधन म्हणून बारवाकडे पाहत असत.

बारव जलव्यवस्थापनेत तीन प्रवेश असणारे बारवांची निर्मिती झाली. अशा प्रकारचे बारव जालना, पेरगी, एरंडेश्वर, तोंडापूर व वेळापूर या ठिकाणी पहायला मिळतात.

बारव जलव्यवस्थापनात चार ठिकाणाहून बारवात प्रवेश असणारी चौरस बारवही आपणास वालूर, पिंगळी, अंबड, सिंदखेडराजा, इडोळी, बीड, मंचर या ठिकाणी आजही पहावयाला मिळतात.

**पोखरणी**

पोखरणी या शब्दाचा अर्थ पुष्कर्णी किंवा मोठा जलाशय असा होतो. पुष्करणी हा शब्द यादव काळात रुढ झाला होता. याची नोंद चक्रधर स्वामी यांच्या लीळाचरित्रातून आली आहे. बारवापेक्षा मोठे जलाषय म्हणजे पोखरणी. पोखरणीचे स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्ये - बारवाच्या तुलनेत कमी रुंदीचे बांधकाम असते - कमी खोलीवर विस्तीर्ण असा भाग तळाशी ठेवून पोखरणीचे बांधकाम करतात. मीसरे म्हणजे समतल भाग तळाशी जास्तीत जास्त मोठा ठेवून कमीत कमी टप्यात बाधकाम पूर्ण करतात. याच्या मध्यभागी काही ठिकाणी मंडपन असतात. अशा प्रकारचे मंडप महाराष्ट्रात औंढानागनाथ जि.हिंगोली, अंबड जि.जालना, त्र्यंबकेश्वर जि.नाशिक, होट्टल जि.नांदेड, वाशिम या ठिकाणी पोखरणी आहेत. होट्टल येथील पोखरणी २५X२५ आकाराची आहे. घोटण जि.अहमदनगर येथील पोखरणी १६.६०X१६.६० मी. आकाराची आहे. अंबड येथील पोखरणी ५४X४८ मिटर आहे. अशा प्रकारच्या पोखरणी आपणास चौरस अष्टकोन आकारात आढळतात. बीड या ठिकाणचे कंकालेश्वर मंदीर हे एका मोठ्या पोखरणीत उभारलेले आहे. हे जलाशय ८५.५०X७७.२५ मी आहे. काही ठिकाणी पोखरणीवर पाणी उपसण्यासाठी मोटेची व्यवस्था केलेली असे. ज्या ठिकाणी मोट आहे त्या ठिकाणी तळाला चौरस किंवा आयात आकाराचा खड्डा असे उदा.अंबड व होट्टल या ठिकाणच्या पोखरणीत आहे.

बेल्हे या पुणे जिल्ह्यातील बारवाला पूर्व व पश्चिम या दिशेने प्रवेश आहे. ही बारव ११८.२८ चौरस मी. आहे. ही बारव पुष्करणी याच प्रकारात मोडते. या बारवातील पाणी अतिशय स्वच्छ आहे व त्या पाण्याचा उपयोग त्या गावातील लोक आजही करतात.

रांजणगाव जि.अहमदनगर या ठिकाणची पुष्करणीचे बेल्हे येथील पुष्करणीशी साम्य आहे. या पुष्करणीत चारही बाजूने प्रवेश आहे.

**तडाग**

जलव्यवस्थापनातील सर्वात मोठा प्रकार म्हणजे तडाग. पोखरणी पेक्षा मोठा जलाशय म्हणजे तडग - तळे किंवा तलाव. या तडागची निर्मिती करत असताना योग्य नैसर्गिक भूभागाची निवड करुन एखाद्या नदीवर वाहून येणारे पाणी एका बाजूला अडवून बंधारा बांधून निर्माण केलेला जलाशय म्हणजे तडाग. या पाण्याचा वापर शेतीसाठी पिण्याचे पाणी म्हणून उपयोग केला जात असे. तडागची उदाहरणे राष्ट्रकुट राजा कृष्ण तिसरा याने कंधारपूर कंधार जि.नांदेड येथे 'जगतुंग समुद्र' हा तालाव किंवा तडाग इ.स.च्या १० व्या शतकात बांधला. 'भिम समुद्र' हा तडाग गणेशवाडी जि.लातूर येथील हा तडाग भिमनाथ याने चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याच्या काळात बांधला. अर्धापूर जि.नांदेड येथील तडाग यादवांच्या काळात तर चालूक्य काळातील धर्मापूरी जि.बीड या ठिकाणी पहावयास मिळतात.


**निष्कर्ष**


अन्न, वस्त्र, निवारा, हवा याबरोबर पाणी हे मानवाचे अविभाज्य घटक आहेत. मानवी वसाहती किंवा मानवाचे जीवन हे साधारणपणे जलसानिध्यातच विकसीत झाले. म्हणून पाण्याला जीवन म्हटलेले आहे.


एकंदरीत जलव्यवस्थापन करत असताना बाराही महिने पाण्याची गरज खात्रीने भागवणाऱ्या जलाशय म्हणून कल्लोळ, कुंड, बारव, विहिरी, तलाव यांची निर्मिती करण्यात आली. सद्यपरिस्थितीत बारवांची स्थिती अतिशय हालाखिची आहे. जुन्या विहिरी गाळ आणि कचऱ्यांनी भरलेल्या आहेत. तलावातही फार मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे. त्यांच्या जतनासाठी त्यांना स्वच्छ करुन हा वारसा आपण जपला पाहिजेत व हे काम शासनाने करण्यापेक्षा समाजाच्याच हातून व्हायला पाहिजेत. नसता हा ऐतिहासिक ठेवा (वारसा) आपल्या हातून गेल्याशिवाय राहणार नाही. नैसर्गिक जल स्त्रोतांच्या ठिकाणी जलदेवतांच्या मुर्ती आढळल्या व जलस्त्रोताच्या ठिकाणी तीर्थक्षेत्र विकसित केली यावरुन प्राचीन मानवाला मानवी जीवनात पाण्याचे महत्त्व समजलेले होते व त्याकडे तो पवित्र दृष्टीने पाहत होता.


**संदर्भ ग्रंथ**


१. जामखेडकर अ.प्र., २००२, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ (खंड-१, भाग२), पृ.२२१-२२३.
२. डॉ.अरुणचंद्र पाठक, २००१, महाराष्ट्रातील बारव स्थापत्य, प्रकाशक सु.ग.जोशी लातूर, पृ.४२-४६
३. जामखेडकर अ.प्र., १९९२, मुंबई, प्राचीन बांधकामे.
४. म.श्री.माटे, १९९८, पुणे, प्राचीन कलाभारती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन.
५. कुलकर्णी र.पु., १९९८, कलकत्ता, भारतीय जलसंधारण व्यवस्था की प्रगती.
६. डॉ.देगलूरकर गो.बा., प्राचीन कालखंडाचा ऐतिहासिक मागोवा.
७. पाठक अरुणचंद्र, पूर्वोक्त, पृ.१०.
८. र.पु. कुलकर्णी, १९९२, कलकत्ता, प्राचीन भारतीय वास्तु साहित्यमे भूमीपरीक्षण.
९. खरे ग.ह., मूर्तीविज्ञान, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे, २०१२.
१०. गद्रे प्रभाकर, मंदिर स्थापत्याचा इतिहास, श्री गणेश प्रकाशन, नागपूर, २०१०.


SCALE 1:100



PLATFORM
PLAN
SECTION ON AA



एचएफ १२३--१२अ मुखेड येथील बारव, जि. नांदेड



बारव, जागजी